MHND100010562021

<u>किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक २८/२०२१ मधील निशाणी-१६ खालील आदेश</u>
<u>मनिषा व इतर १ विरुध्द रुपेश</u>

प्रस्तुत अर्जाव्दारे अर्जदार क्र.1 ने तिला व अर्जदार क्र. २ यास गैरअर्जदाराच्या पगारातुन दरमहा रुपये २०,०००/- कपात करावी म्हणुन दाखल केला आहे.

२. अर्जदार क्र.१ असे कथन करते की, अर्जदार क्र.२ हा तिचा मुलगा असुन तो चार वर्षाचा आहे. अर्जदार क्र.१ व २ यांना दिनांक २१/०५/२०२२ रोजी निशाणी-३ वरील आदेशान्वये दरमहा प्रत्येकी रुपये ५,०००/- अंतरीम पोटगी मंजुर करण्यात आली असुन मुळ अर्जाचा निकाल अदयाप होणे बाकी आहे. गैरअर्जदार हा महा.राज्य विदयुत निर्मिती कंपनी, औष्णीक विदयुत केंद्र, परळी येथे अभियंता या पदावर कार्यरत असुन त्यास दरमहा रुपये १,३०,०००/- इतके वेतन मिळते. त्यामुळे, मुळ अर्जाचा निकाल लागेपावेतो अर्जदारांच्या पोटगीसाठी गैरअर्जदाराच्या वेतनातुन दरमहा रुपये २०,०००/- इतके वेतन कपात होउन मिळण्यचा आदेश पारीत करावा अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

३. अर्जदारांच्या विनंतीनुसार गैरअर्जदार ज्या विज कंपनीत काम करतो त्या आस्थापनेवरील त्याचे वेतन प्रमाणपत्र मागविण्यात आले. त्यानुसार, सदर आस्थापनेवरील अधिका-याने गैरअर्जदाराचे माहे जुलै.२०२२ चे वेतन विवरणपत्र/प्रमाणपत्र त्यांचे दिनांक ०५/०९/२०२२ रोजीच्या पत्रासोबत सादर केले असुन सदरचे पत्र व गैरअर्जदाराचे माहे जुलै.२०२२ चे वेतन विवरणपत्र/प्रमाणपत्र अनुक्रमे निशाणी १७ व १८ वर आहे. गैरअर्जदाराचे माहे जुलै.२०२२ चे वेतन विवरणपत्र/प्रमाणपत्र, निशाणी-१८ चे अवलोकन करता असे दिसुन येते की, गैरअर्जदाराचे माहे जुलै-२०२२ चे एकुण वेतन रुपये १,३१,८६२/- इतके वेतन असुन सर्व कपाती वगळता त्यास एकुण रुपये ६८,३९३/- इतके वेतन मिळते. प्रस्तुत प्रकरणात उभय पक्षांनी पुरावा सादर केला नाही, तसेच, मुळ अर्जाचा निकाल होणे बाकी आहे. अर्जदारांना निशाणी-३ वरील आदेशान्वये अंतरीम पोटगी मंजुर

करण्यात आली आहे. अर्जदार क्र.२ हा ४ वर्षाचा अज्ञान मुलगा असुन त्याचा सांभाळ सदयस्थितीत अर्जदार क्र.१ करते आहे. करीता, गैरअर्जदाराचे माहे जुलै.२०२२ चे वेतन विवरणपत्र/प्रमाणपत्र, निशाणी-१८ विचारात घेता गैरअर्जदाराच्या वेतनातुन दरमहा रुपये १०,०००/-, रुपये दहा हजार फक्त, पुढील आदेशापर्यन्त कपात करुन सदर रक्कम या न्यायालयात जमा करण्यासाठी गैरअर्जदाराच्या अधिका-यांना निर्देश देणे उचीत राहिल असे माझे मत झाले आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे -

<u>आदेश</u>

१- अर्ज, निशाणी-१६ अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२- गैरअर्जदाराच्या वेतनातुन दरमहा रुपये १०,०००/-, रुपये दहा हजार फक्त, पुढील आदेशापर्यन्त कपात करुन सदर रक्कम या न्यायालयात जमा करण्यासाठी गैरअर्जदाराच्या अधिका-यांना निर्देश दयावेत असे आदेशीत करण्यात येत आहे.

३- अर्जदारास आदेशीत करण्यात येते की तिने तिचा साक्षीपुरावा पुढील तारखेस सादर करावा.

07.09.22

दिनांक -०७/०९/२०२२

श्रीमती आर.ए.ए.खतीब,
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, कंधार.